**परिशिष्ट "ब"**

1) ग्राहकांना चोवीस तास (24X7) पाणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याचे उद्‌दिष्ट साध्य व्हावे याकरिता मुंबई जल वितरण आणि सुधारणा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

2) मुंबईला भविष्यकाळात वाढीव पाणीपुरवठा करण्यासाठी गारगाई, पिंजाळ व दमणगंगा हे नविन जल स्त्रोत नक्की करण्यात आलेले आहेत. हे स्त्रोत विकसित करण्यासाठी मसुदा प्रकल्प अहवाल तयार करणे व आवश्यक असलेली मंजुरी घेणे या संबंधीची कामे प्रगतीपथावर आहेत.

3) पवई ते वेरावली आणि पवई ते घाटकोपर ह्या 2250 मिमि व्यासाच्या जलबोगद्‌याचे काम.

4) 90 दशलक्ष लिटर्स क्षमतेचा 'विहार जल शुध्दीकरण प्रकल्पाचे नुतनीकरण करण्यात आले आहे.

5) जलाशयांचे (महासंतुलन जलाशय/सेवा जलाशय) स्ट्रक्चरल ऑडीट करुन दुरुस्त्या करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

6) 2.5 मेगावॅट सौर उर्जा निर्मितीचा प्रकल्प भांडुप संकुल येथे उभारण्यात येत आहे. त्यामुळे दरवर्षी सरासरी 3 कोटी इतक्या रकमेच्या वीजबिलात बचत होईल.

7) पांजरापूर जलशुध्दीकरण प्रकल्पात जलशुध्दीकरण प्रक्रिया करतेवेळी उपलब्ध होणा-या गाळमिश्रीत पाण्यातील गाळ काढून त्या पाण्यावर पुर्नप्रक्रिया करण्याचा प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. त्यामुळे 60 MLD प्रक्रिया करण्यात आलेले पाणी वाया न जाता पुनर्वापराकरिता उपलब्ध होऊन प्रदूषण कमी करता येईल.

**<u>जल पुर्नप्रक्रिया प्रकल्प - पांजरापुर (काम प्रगतीपथावर)</u>**



**<u>गुंदवली – भांडुप जलबोगदा डिसेंबर २०१६ मध्ये कार्यान्वित झाला</u>**



**<u>मध्य वैतरणा धरण (काम पूर्ण व कार्यान्वित)</u>**





# <u>विहार जलशुध्दीकरण केंद्र येथिल AquaDAF Clarifier</u>

